दैनिक
# लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## दहीहंडीत महिलांना नाचवणारे देशद्रोही, संभाजी भिडेंचा तीव्र संताप

पुणे दि.८ (प्रतिनिधी)- दहीहंडी आणि आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात डीजे, डॉल्बी आणि मोठ्या आवाजाच्या साऊंड सिस्टीमवरून सुरू असलेल्या चर्चेला आता आणखी एक राजकीय-सामाजिक वळण मिळाले आहे. शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी हिंदू सणांमध्ये डीजे आणि डॉल्बीचा वापर करण्याला तीव्र विरोध केला आहे. तसेच दहीहंडीच्या कार्यक्रमांमध्ये महिलांना नाचवण्याच्या प्रकारावरही त्यांनी कठोर शब्दांत टीका केली. दहीहंडी हा हिंदूंच्या संस्कृतीशी आणि धार्मिक परंपरेशी जोडलेला सण असल्याचे सांगत, त्यामध्ये महिलांचे नृत्य आयोजित करणे योग्य नसल्याचे भिडे यांनी म्हटले. अशा प्रकारांचे आयोजन करणाऱ्यांना त्यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत 'देशद्रोही' संबोधले. त्याचवेळी डीजे आणि डॉल्बी हिंदू सणांमधून पूर्णपणे हद्दपार करण्याचे आवाहन त्यांनी केले. दहीहंडी उत्सवातील महिलांच्या नृत्यावर बोलताना संभाजी भिडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. दहीहंडी हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नसून हिंदू संस्कृती आणि धर्माशी जोडलेला सण आहे. त्यामुळे त्याचे स्वरूप बदलून त्यामध्ये नृत्याचे कार्यक्रम आयोजित करणे योग्य नाही, अशी त्यांची भूमिका आहे. ''हिंदू सणांमध्ये महिलांना नाचवणे योग्य नाही. दहीहंडीच्या कार्यक्रमात डान्सर नाचवणारे देशद्रोही आहेत,'' अशा शब्दांत त्यांनी टीका केली. संबंधित प्रकार करणारे आपल्याच समाजातील असले तरी त्यांना काय योग्य आणि काय अयोग्य हे समजत नसल्याचेही त्यांनी म्हटले.

(वर्ष ६५ वे अंक २२७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.०९ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## मनोज जरांगेंच्या भेटीसाठी आता सरकारचे शिष्टमंडळ जाणार नाही-विखे पाटील

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज अकरावा दिवस आहे. काल मध्यरात्री प्रसाद लाड, उदय सामंत आणि इतर मंत्र्यांनी मनोज जरांगे यांच्याशी फोनद्वारे संवाद साधला होता. त्यानंतर मनोज जरांगे यांनी बंद केलेले वैद्यकीय उपचार पुन्हा सुरू केले आहेत. आज पुन्हा एकदा सरकारचे शिष्टमंडळ मनोज जरांगे यांची भेट घेणार असल्याची माहिती समोर आली होती. मात्र, आता हे शिष्टमंडळ जरांगे यांच्या भेटीसाठी जाणार नसल्याची माहिती समोर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. तसेच, जरांगे अजूनही आपल्या भूमिकेवर ठाम असतील, तर तो त्यांचा निर्णय असल्याचे विखे पाटील यांनी म्हटले आहे. तसेच सरकारकडून प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, ''जरांगे अजून ठाम असतील तर तो त्यांचा निर्णय आहे. शासनाकडून जे जे निर्णय करणे आवश्यक होते ते आपण केलेले आहेत. त्यात त्यांचे समाधान होत नाही. आपण प्रयत्न करत आहोत पण त्याच्या पलीकडे जाऊन त्यांच्या मनात काही अजूनही प्रश्न असतील तर ते आपण सोडवतच आहोत. शेवटी मराठा समाजाच्या व्यापक हिताकरता आपण निर्णय करत आहोत. त्या निर्णयाची अंमलबजावणी सुद्धा सुरू आहे. त्यात जरांगे पाटील समाधानी नाहीत. त्याच्यामुळे आता माझ्याकडे असा काही पर्याय नाही, ज्यामुळे मी त्यांचे समाधान करू शकेल,'' असे त्यांनी म्हटले.

विखे पाटील पुढे म्हणाले की, ''५८ लाख नोंदी आम्ही ग्रामपंचायतीकडे डिस्प्ले केल्या आहेत. लोकांनी अर्ज केले आहेत. ५२० अर्ज आले. २४० अर्ज केवळ दाखले काढण्यासाठी होते. जशी वस्तुस्थिती पुढे येईल, वंशावळ बदल असतील त्याचे दाखले मिळतील. जे कोणी दिले नाही ते या दोन नेत्यांनी पुढे येऊन काम केलं आहे. ज्यांनी काम केलं त्यांना तुम्ही नावं ठेवत आहात. मराठी समाज हे मान्य करणार नाही. सरकार सकारात्मक नसेल तर भाग वेगळा होता. पण, २५-३० वर्षात असे चांगले निर्णय झाले नाही,'' असे म्हणत त्यांनी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यावर होत असलेल्या टीकेवर भाष्य केले.

यावेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावरही टीका केली. ''उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री असताना आरक्षण घालवलं. सरकार नेहमीच एक पाऊल पुढे आले आहे आणि आता जरांगे पाटील यांनी समाधान व्यक्त केले पाहिजे की सरकारने घेतलेल्या निर्णयांमुळे मराठा समाजाला न्याय द्यायची भूमिका झाली आहे. त्यांनी काय अल्टीमेटम द्यावा हा त्यांचा निर्णय आहे. सरकार म्हणून आम्ही जी निर्णय प्रक्रिया करायला पाहिजे होती, ती आम्ही केलेली आहे असेही विखे पाटील म्हणाले.

### तुझ्या सात पिढ्या राजकारणात असल्या तरी मी जरांगे आहे, उखडून टाकू; मनोज जरांगे विखे-पाटलांवर संतापले

जालना दि.८ (प्रतिनिधी)- सत्ताधारी मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आज केलेल्या विधानानंतर मनोज जरांगे पाटील संतप्त झाल्याचे पाहायला मिळाले. विखे-पाटील मराठ्यांचे वाटोळे करत आहे. फक्त फडणवीसचे गुणगान गायचे आणि शरद पवारने काहीच दिले नाही एवढेच तुणतुणे यांनी वर्षभर वाजवले. मराठ्यांना मोठं करण्याचा विडा घेतला तर अपमान पचवायची ताकद ठेवा. तुम्ही वर्षभर मराठ्यांना कशाला नाचवले? असा सवाल मनोज जरांगे यांनी विचारला. ते मंगळवारी अंतरवाली सराटी येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

तुम्ही सपशेल अपयशी ठरलात. मराठ्यांना तुम्ही दगा फटका दिला, तुमच्यामुळे मराठ्यांचे वाटोळ झाले. तू अंतरवालीमध्ये ये किंवा नको येऊ तुला बोलवत नाहीत. सरकारला समजून घ्यायला सरकार बाप आहे का? देवेंद्र फडणवीस हा आजवरचा सगळ्यात निष्क्रिय मुख्यमंत्री आहे, अशी टीका मनोज जरांगे यांनी केली. तुमचे ठरले आहे मराठ्यांच्या रॅलीवर हल्ला करायचा. याला पाऊल म्हणतात का, आम्ही कधीच अंतरवालीमध्ये जाणार नाही. तुम्ही मराठ्यांना कलंक आहात. तुम्हाला अंतरावलीमध्ये कोण ये म्हणते. ते येणार म्हटले आता येत नसतील तर नको येऊ. तुझ्या सात पिढ्या राजकारणात असल्या तरी मी जरांगे आहे, उखडून टाकू, अशी घणाघाती टीका जरांगे पाटील यांनी केली.

नगर जिल्ह्यातील खूप नेत्यांनी मला सांगितले होते की, विखे-पाटील दगाबाज आहेत. विखे सारखे उपसमितीचे अध्यक्ष असले तर मराठ्यांचे वाटोळेच होणार. विखेंना यापासून पळ काढता येणार नाही. देवेंद्र फडणवीस मराठा आरक्षण देत नाही. ते काही करत नाहीत फक्त दिखावा आहे. मला जेलमध्ये टाकायचे तर टाका. १२ तारखेला बैठक होणार हे आमचे ठरले आहे, असेही जरांगे पाटील यांनी सांगितले.

## उत्सव लोकांसाठी, त्रास देण्यासाठी नव्हे!; डीजे, पेपरफुटीवरून उद्धव ठाकरेंचा सरकारला सवाल

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- गणेशोत्सव आणि दहीहंडीच्या पार्श्वभूमीवर उत्सवांमध्ये वाढणारा ध्वनिप्रदूषणाचा त्रास, डीजेचा वापर, अश्लील नृत्य, एमपीएससी परीक्षांमधील गोंधळ, मराठा आरक्षण, पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्हाचा वाद, तसेच राज्यातील राजकीय परिस्थिती अशा विविध मुद्द्यांवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सरकारवर जोरदार टीका केली. उत्सव हे जनतेच्या आनंदासाठी असावेत, त्यातून नागरिकांना त्रास होता कामा नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.

गणेशोत्सवाच्या मूळ उद्देशाची आठवण करून देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, लोकमान्य टिळकांनी घरातील गणपती सार्वजनिक करून त्याला सामाजिक आणि राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप दिले. स्वातंत्र्य चळवळीत अधिकाधिक जनतेने सहभागी व्हावे, हा त्यामागचा उद्देश होता. पुढे या चळवळीचे रूपांतर उत्सवात झाले; मात्र आता काही ठिकाणी उत्सवाचे रूपांतर गोंगाटात होत असल्याचे त्यांनी म्हटले. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकांमध्ये काही



वर्षांपूर्वी सुरू झालेला विशिष्ट नृत्यप्रकार जनतेच्या विरोधामुळे बंद झाला, असेही त्यांनी सांगितले. आरती, झांज आणि घंटानाद यांसारख्या पारंपरिक पद्धतींमध्येही उत्सवाचा आनंद मिळतो. त्यामुळे मोठ्या आवाजातील डीजे आणि ध्वनिप्रदूषणाचा आग्रह कशासाठी, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ''उत्सव हे जनतेच्या आनंदासाठी असावेत, जनतेला त्रास देण्यासाठी नसावेत,'' अशी स्पष्ट भूमिका ठाकरे यांनी मांडली.

सरकारने आंदोलन करणाऱ्या किंवा प्रश्न उपस्थित करणाऱ्या व्यक्तींशी चर्चा करण्याऐवजी त्यांच्यावर कारवाई करण्याची पद्धत स्वीकारल्याचा आरोपही उद्धव ठाकरे यांनी केला. प्रश्न निर्माण करणाऱ्या व्यक्तींना रात्री उशिरा ताब्यात घेण्यापेक्षा त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. डीजेच्या मुद्द्यावरही थेट गणेशोत्सव मंडळांशी चर्चा करावी, असा सल्ला त्यांनी दिला. मुंबईतील गणेशोत्सव मंडळांची आपण यापूर्वी बैठक घेत असल्याचे सांगत त्यांनी सामाजिक विषयांवर मंडळांनी जनजागृती करावी, यासाठीही प्रयत्न केल्याचे नमूद केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, गणेशोत्सव मंडळांशी योग्य संवाद साधला तर अनेक प्रश्न टोकाला जाण्यापूर्वीच सोडवता येऊ शकतात. प्रत्येक गणेशोत्सव मंडळाला वेळेची मर्यादा, ध्वनीची मर्यादा आणि पारंपरिक वाद्यांचा वापर याबाबत समजावून सांगण्याची गरज आहे.

दहीहंडी उत्सवात काही ठिकाणी झालेल्या अश्लील नृत्यांवरूनही उद्धव ठाकरे यांनी सरकारला लक्ष्य केले. अशा प्रकारांना हिंदुत्व म्हणायचे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. नवहिंदुत्ववादी म्हणून स्वतःला मिरवणाऱ्यांना अशा प्रकारच्या कार्यक्रमांबाबत काय वाटते, असा टोला त्यांनी लगावला. दहीहंडी हा पारंपरिक आणि उत्साहाचा (पान ४ वर)

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मुंबईतील कार्यक्रमाच्या ठिकाणी मोठी सुरक्षा त्रुटी

### बनावट पीएमओ अधिकारी आणि सशस्त्र अंगरक्षकाला अटक

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल येथील नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर परिसरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नियोजित कार्यक्रमापूर्वी सुरक्षेतील एका मोठ्या त्रुटीमुळे खळबळ उडाली आहे. कडक सुरक्षा व्यवस्था असतानाही स्वतःला पंतप्रधान कार्यालयाचा वरिष्ठ अधिकारी सांगणारा एक भामटा आणि त्याच्या सशस्त्र अंगरक्षकाला मुंबई पोलिसांनी कार्यक्रमस्थळावरून शिताफीने ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे व्हीव्हीआयपी सुरक्षेत तैनात असलेल्या यंत्रणांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ताब्यात घेण्यात आलेल्या मुख्य संशयिताचे नाव रोहन पारेख (वय २४ वर्षे) असे आहे. रोहन पारेख हा एनएमएसीसी संकुलात अत्यंत रुबाबात वावरत होता आणि स्वतः पंतप्रधान कार्यालयाचा वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवत होता. विशेष म्हणजे, त्याच्या संरक्षणासाठी त्याने स्वतःसोबत एक खासगी अंगरक्षकही (बॉडीगार्ड) ठेवला होता. पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर विशेष सुरक्षा दल आणि मुंबई पोलिसांकडून परिसरात कडक तपासणी सुरू होती. त्यावेळी रोहन आणि त्याच्या अंगरक्षकाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्यांना रोखले. चौकशीदरम्यान रोहनने पोलिसांना पंतप्रधान कार्यालयाचे ओळखपत्र दाखवले; मात्र सूक्ष्म तपासणीअंती ते ओळखपत्र पूर्णपणे बनावट असल्याचे निष्पन्न झाले. झडती घेतली असता त्याच्या अंगरक्षकाकडे एक लोड केलेली बंदूक (पिस्तूल) मिळून आल्याने सुरक्षा अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्याच्या अनुषंगाने बीकेसी परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त आणि कडक सुरक्षा प्रोटोकॉल लागू करण्यात आला होता. अशा अत्यंत संवेदनशील ठिकाणी एक २४ वर्षांचा युवक बनावट ओळखपत्र आणि शस्त्रासह थेट कार्यक्रमाच्या आवारात कसा काय पोहोचला, असा गंभीर प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. वेळीच सतर्कता दाखवल्यामुळे मोठा अनर्थ टळला असला, तरी या सुरक्षा त्रुटीने यंत्रणांच्या कारभारावर प्रश्न निर्माण केले आहेत.

## जशास तसे उत्तर देऊ; शिंदे-फडणवीसांबद्दल एकेरी भाषेवरून भरत गोगावलेंचा मनोज जरांगेंना इशारा

रायगड दि.८ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज ११ वा दिवस आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री उदय सामंत आणि आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे यांची भेट घेऊन सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले व उपोषण मागे घेण्याची देखील विनंती केली. मात्र जरांगे पाटील आपल्या सर्व मागण्यांवर ठाम असून उपोषण सुरूच ठेवले आहे. त्यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबतीत जरांगे पाटील जी भाषा वापरत आहेत, त्यावरून सरकारकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. जशास तसे उत्तर देऊ, सांगून टाका त्याला, अशा शब्दांत मंत्री भरत गोगावले यांनी तर आम्ही देखील रस्त्यावर उतरू, असा इशारा मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री भरत गोगावले यांनी मनोज जरांगे यांना थेट इशारा दिला आहे. ते म्हणाले, हैदराबाद गॅझेट असेल, आरक्षण वगैरे ठीक आहे. मात्र आमच्या नेत्यांवर बोलतील तर कोणताही नेता सहन करणार नाही. एकनाथ शिंदे यांनी आरक्षण दिले, शिंदे साहेबांनी मागे पुढे पाहिले नाही, ५ हजार ३०० जणांना नोकऱ्या दिल्या आहेत. सारथीला न्याय दिला गेला, असे म्हणत गोगावले यांनी म्हटले आहे. पुढे बोलताना भरत गोगावले म्हणाले, मनोज जरांगे राजकारणावर बोलले तर आम्ही पण उत्तर देऊ, आम्ही पण मराठे आहोत, आमच्यावर पण केसेस आहेत. तसेच देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यावर एकेरी बोलत असाल तर जशास तसे उत्तर देऊ, सांगून टाका त्याला, रायगडाच्या मावळ्याचा हा इशारा आहे, अशा शब्दांत गोगावले यांनी इशारा दिला आहे.

## खेळाडूंसाठी नोकरीत सुधारित आरक्षण; राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. विशेषतः क्रीडा, आरोग्य, वस्त्रोद्योग आणि विधी व न्याय विभागाशी संबंधित अनेक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या आरक्षणाबाबत सुधारित धोरण लागू करण्याचा निर्णय सरकारने आजच्या बैठकीत घेतला आहे.

यासह सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने नवा प्रकल्प राबवण्यासही मंजूरी देण्यात आली आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे नवीन सत्र न्यायालय स्थापन करण्यासही मंजूरी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

राज्यातील गुणवंत व यशस्वी खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रांतील नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या ५ टक्के आरक्षणाबाबत सुधारित धोरण लागू करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. या सुधारित धोरणामुळे पूर्वीचे सर्व शासन निर्णय, शासन शुद्धीपत्रके, परिपत्रके आणि संबंधित पत्रे पूर्णपणे रद्द करण्यात आली आहेत.

सार्वजनिक आरोग्य यंत्रणा अधिक सुदृढ, अद्ययावत आणि तंत्रज्ञानस्नेही करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत प्रगती हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत राबवल्या जाणाऱ्या या प्रकल्पासाठी आशियाई विकास बँकेकडून अर्थसाहाय्य (कर्ज) घेण्यास आणि त्यामध्ये राज्य शासनाचा आर्थिक वाटा समाविष्ट करण्याच्या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिली आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे नवीन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यात येणार आहे. या न्यायालयासाठी आवश्यक असणारी पदे निर्माण करण्यास तसेच खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे. वस्त्रोद्योग विभागांतर्गत ह्योसंग इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना भांडवली अनुदान देण्यास मंजूरी देण्याचा निर्णय देखील आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

## जरांगे म्हणजे बिनबुडाचे गाडगे, त्यांच्यावर बोलणे व्यर्थ!; गुणरत्न सदावर्ते यांची टीका

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापलेले असतानाच ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार टीका केली आहे. जरांगे यांच्या आंदोलनातून संविधानिक व्यवस्था आणि आरक्षणाच्या कायदेशीर चौकटीला धक्का पोहोचण्याची शक्यता असल्याचा आरोप सदावर्ते यांनी केला. याचवेळी त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत, ठाकरे कुटुंब आणि महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यावरही तीव्र शब्दांत निशाणा साधला. पत्रकार परिषदेत सदावर्ते यांनी मराठा आरक्षणासह छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेशी संबंधित वाद, मुंबईतील बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्याचा मुद्दा आणि राज्यातील भाषिक राजकारणावर आपली भूमिका मांडली. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत बोलताना सदावर्ते यांनी अत्यंत आक्रमक शब्दांचा वापर केला. जरांगे यांच्यामार्फत महाराष्ट्राला संविधानिकदृष्ट्या मागे नेण्याचा प्रयत्न होऊ नये, असे ते म्हणाले. ''जरांगे हे बिनबुडाचं गाडगं आहे, बिनपेंद्याचा लोटा आहे,'' अशी टीका सदावर्ते यांनी केली. जरांगे यांच्या मागण्यांमुळे आरक्षणाच्या कायदेशीर प्रक्रियेला आणि संविधानिक व्यवस्थेला धक्का बसू नये, असे त्यांनी स्पष्ट केले. जरांगे यांच्या आंदोलनाला अनावश्यक महत्त्व देण्याची गरज नसल्याचे सांगत आता हे आंदोलन गुंडाळण्याची वेळ आली असल्याचेही सदावर्ते म्हणाले.

## राज्यात ७० टक्के सोयाबीन उद्ध्वस्त; सरकार जरांगे पाटलांसमोर गुडघे टेकण्यात व्यस्त!

### काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची सडकून टीका

नागपूर दि.८ (प्रतिनिधी)- राज्यात गेल्या ३० ते ३५ दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने सोयाबीनसह इतर खरीप पिके पूर्णपणे करपून गेली आहेत. जवळपास ७० टक्के सोयाबीन पीक नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याने बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. मात्र, सरकार मनोज जरांगे पाटलांसमोर गुडघे टेकण्यात व्यस्त आहे. आता परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घ्यावे आणि सरकारने युद्धपातळीवर पंचनामे करावेत. शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी जोरदार मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

राज्यात पावसाने ओढ दिल्याने सोयाबीनसह खरीप पिकांवर संकट आले आहे. सोयाबीन, मूग, उडीद, मका, बाजरी, तूर खरीप पिके करपून गेली आहेत. तर मराठवाड्यातील पाणीसाठा पिण्यासाठी राखून ठेवा असा आदेश विभागीय आयुक्तांनी दिलाय.

वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी सध्या अत्यंत गंभीर संकटात सापडला असून, जवळपास ७० टक्के सोयाबीनचे पीक नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडून ते पुन्हा कर्जबाजारी होण्याची भीती आहे. शेतकऱ्यांना या संकटातून वाचवण्यासाठी सरकारने युद्धपातळीवर उपाययोजना कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

एमपीएससी परीक्षांमधील गैरप्रकारांवर बोलताना वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. एमपीएससी अध्यक्ष स्वच्छ



असल्याचे सांगत आहेत. पण त्यांच्या काळात परीक्षा वारंवार रद्द झाल्या आहेत, त्याची जबाबदारी कोणाची आहे? केवळ मी स्वच्छ आहे असे सांगून प्रश्न सुटणार नाही, जेव्हा पेपर फुटले त्यासाठी जे जबाबदार होते त्यांच्यावरही कारवाई करावी, असे वडेट्टीवार म्हणाले.

## राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा दिल्लीऐवजी गुजरातमध्ये होणार

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या ७२ वर्षांच्या इतिहासात प्रथमच एक अत्यंत ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. आतापर्यंत नेहमी देशाची राजधानी नवी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित केला जाणारा हा भव्य सोहळा यंदा दिल्लीबाहेर आयोजित केला जाणार आहे. गुजरातमधील केवडिया (सध्याचे नाव एकता नगर) येथील जगातील सर्वात उंच स्टॅच्यू ऑफ युनिटी समोर हा ७२ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. येत्या २२ सप्टेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विजेत्यांना हे मानाचे पुरस्कार प्रदान केले जातील.

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा दिल्लीच्या बाहेर देशाच्या विविध भागांत आयोजित करण्याचा मोठा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. एक भारत, श्रेष्ठ भारत ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे आणि प्रादेशिक विविधतेला सन्मान देणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. १९५४ मध्ये स्थापन झालेले हे राष्ट्रीय पुरस्कार भारतीय सिनेसृष्टीतील सर्वात प्रतिष्ठित सन्मान मानले जातात. ७ दशकांपासून दिल्लीत होणाऱ्या या सोहळ्याचे ठिकाण बदलून यंदा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ५९७ फूट उंच स्मारकासमोर (स्टॅच्यू ऑफ युनिटी) ठेवण्यात आले आहे.

## आमच्याकडे काहीतरी योजना आहे, देशभरातील वसतिगृहांबाबत सर्वोच्च न्यायालय महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या तयारीत

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- दिल्लीच्या सत्य निकेतन परिसरातील पेईंग गेस्ट इमारत दुर्घटनेची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. तसंच, येत्या काळात देशभरातील विद्यार्थी वसतिगृहांच्या आणि पीजीच्या सुरक्षेबाबत व्यापक निर्देश जारी करण्यात येणार आहेत. या संदर्भातील याचिकेवर १० सप्टेंबर रोजी सुनावणी घेण्यास न्यायालयाने संमती दिली आहे. टाइम्स नाऊने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली सुरू असलेल्या बेकायदा बांधकाम प्रकरणातील ॲमिकस क्युरी अजित कुमार सिन्हा यांच्या याचिकेवर सुनावणीदरम्यान हे निरीक्षण नोंदवण्यात आलं. सिन्हा यांनी दिल्लीतील सर्व खासगी वसतिगृहे आणि पीजी निवासांचे सर्वसमावेशक सुरक्षा ऑडिट करण्याचे आदेश देण्याची विनंती न्यायालयाला केली होती. न्या. अहसानुद्दीन अमानुल्लाह यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर हा मुद्दा मांडताना सिन्हा यांनी युक्तिवाद केला की, सत्य निकेतन दुर्घटनेने विद्यार्थ्यांच्या निवासाच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत.

दिल्ली प्रशासनाची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी या दुर्घटनेचे वर्णन अत्यंत भयानक घटना असे केले. दिल्ली उच्च न्यायालयाने यापूर्वीच दिल्ली महानगरपालिकेच्या भूमिकेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले असून, संपूर्ण शहरात पीजीच्या सुरक्षा ऑडिटचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. ''आम्ही हे प्रकरण वर्ग करणार नाही. उलट आम्ही याची व्याप्ती वाढवू. आम्ही संपूर्ण भारतासाठी (पान ४ वर)

## मनोज जरांगे यांच्यावर मध्यरात्री सलाईनद्वारे उपचार

जालना दि.८ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मागील दहा दिवसांपासून उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची सोमवारी मध्यरात्री जालना येथील जिल्हा रुग्णालयाच्या पथकाने त्यांची वैद्यकीय तपासणी केली व सलाईन लावून उपचार करण्यात आले. आता त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

सोमवारी मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास जिल्हा प्रशासन व जिल्हा रुग्णालयाच्या विशेष पथकाने त्यांची वैद्यकीय तपासणी केली. उपोषणामुळे जरांगे पाटील यांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण आणि रक्तदाब कमी झाल्याचे तसेच त्यांचे वजन घटल्याचे तपासणीत आढळून आले.

जरांगे यांच्या प्रकृतीची माहिती मिळताच मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड तसेच जिल्हा प्रशासनाच्या विशेष पथकाने त्यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून जरांगे पाटील यांना सलाईन घेण्याची विनंती केली. ही विनंती मान्य करत जरांगे पाटील यांनी सलाईनद्वारे उपचार घेण्यास संमती दिली. त्यानंतर त्यांना मध्यरात्री चार व आज दिवसभरात दोन सलाईन लावण्यात आल्या, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

## ट्रक अन् बोलेरोच्या धडकेत ६ जणांचा मृत्यू, ७ गंभीर जखमी; गोंदिया-बालाघाट महामार्गावरील दुर्घटना

गोंदिया दि.८ (प्रतिनिधी)- गोंदिया-बालाघाट राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. गोंदियाच्या नागरा येथे भरधाव ट्रक आणि बोलेरो प्रवासी वाहनाची समोरासमोर धडक झाली. या अपघातात ६ जणांचा जागीच मृत्यू झाला असून ७ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, गोंदियाकडून बालाघाटच्या दिशेने एक भरधाव ट्रक जात होता. याचवेळी बालाघाटकडून गोंदियाच्या दिशेने बोलेरो प्रवासी वाहन येत होते. नागरा परिसरात दोन्ही वाहनांची जोरदार समोरासमोर धडक झाली. दोन्ही वाहनांमध्ये झालेली धडक इतकी भीषण होती की बोलेरो वाहनाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.

या भीषण अपघातात बोलेरोमधील ६ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर अन्य ७ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या अपघातातील मृत्यू झालेले सर्व प्रवासी मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मात्र, मृत आणि जखमी प्रवाशांची अधिकृत ओळख तसेच अपघातातील नेमकी परिस्थिती याबाबत संबंधित प्रशासनाकडून अधिक माहिती समोर येणे बाकी आहे. दरम्यान, या भीषण अपघातामुळे गोंदिया-बालाघाट महामार्गावर काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला होता.

# संत शिरोमणी सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त वैजापूरात अभिवादन



वैजापूर, दि. ८ (प्रतिनिधी) – संत ज्ञानेश्वर महाराज व संत नामदेव महाराज यांच्या समकालीन असलेले महान संत शिरोमणी सेना म हाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त येथील संत सेना महाराज समाजमंदिरात त्यांच्या प्रतिमेचे पूजन,आरती संत सेना महाराज यांचे अभंग गायन व महाप्रसाद

असे विविध कार्यक्रम मंगळवार (ता.८) रोजी आयोजित करून त्यांना अभिवादन करण्यात आले. आरंभी तालुक्याचे आमदार प्रा.रमेश पा.बोरनारे, नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख, माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी, शिक्षण सभापती बाबासाहेब पुतळे, नगरसेवक पारस घाटे, माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, नगरसेवक व गट नेते दशरथ बनकर, राजेश गायकवाड, हमीद कुरेशी, संदीप ठोंबरे, ज्ञानेश्वर सिरसाट यांनी संत सेना महाराज यांच्या प्रतिमाचे पूजन करून अभिवादन केले. संत सेना महाराज पुण्यतिथी समितीच्या सर्व पदाधिकारी यांनी आलेल्या मान्यवरांचे शाल टाकुन सत्कार केला. शहरातील नाभिक समाजातील जेष्ठ मंडळी तसेच तरुण, युवक यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. या वर्षी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# योगेश्वरानंद प.पू. सद्‌गुरू डॉ. श्री मंगलनाथ महाराज यांचा जन्मोत्सव





छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – मिटमिटा येथील स्वामी श्री मच्छिंद्रनाथ व श्री सप्तशृंगी माता मंदिरात दिनांक ०६.०९.२०२६ रविवार रोजी म्हणजेच श्रावण वद्य दशमीला योगेश्वरानंद परमपूज्य सद्‌गुरू डॉ. श्री मंगलनाथ महाराज यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रातःस्मरण मानसपूजा नंतर श्री देवीदास कुळकर्णी यांचा लघुरुद्र या निमित्ताने आयोजित करण्यात आला होता. श्री स्वामी मच्छिंद्रनाथ महाराजांना विभूती अभिषेक, मंगलगाथा चक्रीपारायण, सद्गुरु पूजन, धवल वस्त्र अर्पण, परमपूज्य सद्‌गुरू श्री मंगलनाथ महाराजांच्या समाधीचे पूजन, चंदनाचा आलेप, समाधीवर अनुग्रह मंत्राने विभूती अभिषेक नारायण पूजन, महाआरती आणि महाप्रसाद अश्या रीतीने परमपूज्य सद्गुरु डॉ श्री मंगलनाथ महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त अनेक शिष्य आणि नाथ भक्तांच्या सहभागाने भावमय आणि भक्तिमय वातावरणात कार्यक्रम पार पडलेत. कार्यक्रमासाठी व्यवस्थापकीय विश्वस्त श्री वेदांत रत्नपारखी, श्री सुभाष गायकवाड, मोहन देशमुख, अरविंद गायकवाड, प्राची रत्नपारखी, प्रतिभा सींदफळकर, यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सुखाचा खरा ठेवा आपल्या घरातच बाहेर शोधलेला आनंद क्षणिक असतो

**सुखी** व आनंदी जीवनासाठी घरातील वातावरण सदा सर्वदा आनंदी व मन प्रसन्न ठेवणारे असावे कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती सुख, समाधान, आनंद, प्रसन्नता शोधण्यासाठी बाहेरच्या जगतात शोध घेत फिरतो. धार्मिक स्थळी, निसर्गरम्य ठिकाणी, थंड हवेच्या ठिकाणी व सर्वत्रच शोध घेतो व शेवटी घरी येतो. जे सुख जे समाधान, जो आनंद घरात असतो तो इतरत्र कितीही शोधला तरी सापडत नाही. बाहेर सुख, समाधान आनंद मिळेल परंतु ते क्षणिक असेल. पैसे खर्च करूनही आनंद, सुख विकत घेता येते पण ते क्षणिक व काळाच्या ओघात लोप पावणारे असते.

समाजातील व्यक्तीनी सुखाचा शोध बाह्य जगतात घेण्याची गरज नाही किंवा पैसे खर्च करून विकत घेण्याची गरज नाही तर खरे सुख, खरा आनंद हा आपल्या घरात व आपल्या परिवारात दडलेला असतो. आपल्या परिवारातील, आपल्या कुटुंबातील वातावरण शांतमय, आनंदी, प्रसन्न, व समाधानी ठेवले तर जगातील सर्व प्रकारची सुखे ही घरातच असतात हे दिसून येते. घरातील किंवा परिवारातील कुटुंबाशी असलेले नाते संबंध अत्यंत मान, सन्मानाने जपणे, जिव्हाळाने जपणे, कुटुंबातील जेष्ठांचा मान सन्मान राखणे, कुटुंबाच्या रूढी परंपरा, रिती, रिवाज, कुटुंबाची नैतीक, पारिवारिक मूल्ये, जिवापाड जपणे, सर्वांशी सुसंवाद साधने, वाद, प्रतिवाद टाळणे, सर्वांच्या मताला, सर्वांच्या विचारांना ऐकून घेणे, कुणाच्याही मान, मर्यादाचे उल्लंघन होणार नाही याची कुटुंबातील प्रत्येक घटकाने काळजी घेणे, आपापली कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे या बाबी घरात असल्या की, सुखी, समाधानी व आनंदी जीवन सहज जगण्यास मि ळते.

सुखी जीवनासाठी, आनंदी जीवनासाठी, समाधानी जीवनासाठी नुसते घर सुंदर, सर्व सोयीयुक्त घर, उत्कृष्ट रचना असलेलं घर, प्रशस्त घर असणे गरजेचे नाही, तर घरात चांगले व प्रसन्न वातावरण असणे गरजेचे आहे. एखादं वेळी जेवायला घरात नसेल तर चालेल पण घरातील वातावरण अत्यंत मंगलमय व प्रसन्न असणे अत्यंत गरजेचे आहे.अशा घरात, अशा परिवारात जीवनाचा जो आनंद मिळतो तो कोठेच व बाह्य जगतात तर अजिबात नसतो.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# 'डीजे'मुक्त उत्सव व्हायला हवा; पण धर्म, संस्कृती, उत्सव यांवरील टीका खपवून घेणार नाही !

पुणे दि. ८ (प्रतिनिधी) – गणेशोत्सवातील 'डीजे' आणि ध्वनीप्रदूषणाचा विषय सध्या बराच चर्चेत आहे. हिंदु जनजागृती समिती गेल्या २४ वर्षांपासून 'उत्सवांमध्ये डीजे किंवा कर्णकर्कश ध्वनीवर्धक लावू नका' याविषयी प्रबोधन करत आहे. 'उत्सवांतील गैरप्रकार रोखा' अशी व्यापक प्रबोधनपर मोहिम राबवत आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी काही वर्षांपूर्वी जसे 'गणेशमूर्तींचे नदीत विसर्जन केल्याने जलप्रदूषण होते', हा प्रचार करत नॅरेटिव्ह सेट केला होता. वर्षातील ३६५ दिवस नदी प्रदूषित होण्याला ज्या गंभीर गोष्टी कारणीभूत आहेत, त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून केवळ गणेशोत्सवतील १० दिवसांत प्रदूषण होते, म्हणून कृत्रिम हौदांची टूम चालू झाली. त्याच प्रकारे आता ध्वनिप्रदूषणाची टूम आली आहे. 'डीजे'मुळे गणेशोत्सवात होणारे ध्वनीप्रदूषण नक्कीच थांबायला हवे, पण वर्षभर ध्वनीप्रदूषण करणाऱ्या अन्य कारणांचा आपण विचार करणार आहोत कि नाही ? विद्यानंद बापट आणि पुरोगामी टोळी जी मागणी करत आहे, त्यांनी ध्वनीप्रदूषण करणारे मशिदींवरील भोंगे उतरवा, थर्टी फर्स्टच्या रात्रीचे कार्यक्रम, तसेच 'सनबर्न'सारखे मोठे म्युझिक इव्हेंट थांबवा, ही मागणी पण करणार आहेत का? केवळ गणेशोत्सवाला लक्ष्य करून हिंदु धर्मातील 'द्वैत-अद्वैत तत्त्वज्ञाना'ला 'बौद्धिक हस्तमैथुन' म्हणणे, सण-उत्सवांना 'लष्करे-उत्सव' म्हणणे, ही ध्वनीप्रदूषणाच्या सूत्राच्या आडून धर्मावर आघात करणारी तथाकथित पुरोगामी मानसिकता दिसून येते, याचा आम्ही निषेध करतो. भारतात संविधानाचे राज्य आहे, त्यामुळे ध्वनीप्रदूषणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अवश्य कारवाई व्हावी; मात्र 'अभिव्यक्ती स्वातंत्र्या'च्या नावाखाली हिंदु धर्मावर टीका करणाऱ्यांवरही कायद्यानुसार कारवाई व्हायला हवी, अशी आम्ही मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

हिंदु जनजागृती समिती उत्सवाचे पावित्र्यरक्षण आणि धार्मिकता जपण्यासाठी मंडपांमध्ये जुगार खेळणे, दारू पिणे, दारूच्या नशेत अंगविक्षेप नृत्य करणे, श्री गणेश मंडपासमोर अश्लील गाणी लावणे, मंडपासमोर मद्यपान-धुम्रपान करणे, सक्तीने वर्गणी मागणे आदी गैरप्रकारांविरोधात दोन दशकांपासून जनजागृती करत आहे. त्यामुळे 'डीजे विरोध' एवढीच आमची भूमिका नसून 'आदर्श आणि सात्त्विक सार्वजनिक उत्सव' ही आमची व्यापक भूमिका आहे. गणेशोत्सव धर्माचरण, संस्कृतीचे संवर्धन, राष्ट्रभक्ती, समाजप्रबोधन आणि समाजोपयोगी उपक्रम यांना प्रोत्साहन देण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. या दृष्टीने त्याकडे पहायला हवे, असेही समितीने म्हटले आहे.

# लघुदाब वाहिनीला टॅप करून वीजचोरी; सात गावांतील १९ जणांवर गुन्हे

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – महावितरणने राबवलेल्या मोहिमेत तालुक्यातील सात गावांतील १९ जण वीजचोरी करताना आढळून आले. लघुदाब वाहिनीला टॅप करून ते अनधिकृतरीत्या वीज वापरत होते. सर्व आरोपींवर चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले.

महावितरणच्या हर्सुल ग्रामीण शाखेचे सहायक अभियंता कडुबा काळे व त्यांचे सहकारी शोकत पटेल, आगळे, वाघ, बोर्डे, विठ्ठल धायगुडे व सुमित पवार व इतर कर्मचाऱ्यांसह छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील पिसादेवी, पळशी, बकापूर, मांडकी, गोपाळपूर, सहजतपुर व आडगाव सरग या गावांत वीजजोडणी तपासणी मोहीम राबवली. त्यात महावितरणच्या लघुदाब वाहिनीच्या खांबावरून आलेल्या/मीटरच्या इनकमिंग वायरला टॅप करून काही ग्राहक वीजचोरी करताना आढळून आले.

यात पिसादेवी येथील मनोज शालीकराम साबळे याने ५ हजार २८०, युनुस इब्राहीम सय्यद याने १२ हजार ९८०, मंगल नितीन चंदनशिव या ग्राहकाने ११ हजार ३३०, रमेश सखाराम चंदनशिव याने ११ हजार ३३०, पळशी येथील संजय खंडू राठोड याने ३ हजार ७५०, शहानुरबी जाफर सय्यद या ग्राहकाने ७ हजार ५३०, वजीर शाहा याने ११ हजार ८९०, सलमान शेख याने १३ हजार २६०, शाहरुख महेबूब शाहा याने ७ हजार ७७०, सुलतान शेख याने १३ हजार २६०, बकापूर येथील आयुब खा उमर खा याने ७ हजार ७६०, युनुस खा उमर खा याने ७ हजार ७६०, बुरे खा नाकेदार याने ७ हजार ७६०, मांडकी येथील मीनाबाई कारभारी थोरात या ग्राहकाने २७ हजार ४००, संपत श्रीपत गायके याने २२ हजार ४४०, गोपाळपूर येथील ताराचंद आर. बेडेकर याने २६ हजार ९८०, इंदर कुशाबा पठाडे याने २५ हजार ६२०, सहजतपूर येथील शांताराम नारायण हिरडे याने २८ हजार ७२५ व आडगाव सरग येथील कांताबाई अनिल सोमदे या ग्राहकाने ३ हजार २८० रुपयांची वीजचोरी केली. सर्वांनी १३ हजार ५६० युनिट वीज अनधिकृतपणे वापरून महावितरणचे २ लाख ३० हजार ११९ रुपयांचे नुकसान केले. सहायक अभियंता कडुबा काळे यांच्या फिर्यादीवरून भारतीय विद्युत कायद्याच्या कलम १३५ अन्वये १९ आरोपींवर चिकलठाणा पोलिस ठाण्यात सोमवारी रात्री गुन्हे दाखल करण्यात आले.

# महावितरणच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी श्री.गजेंद्र बावणे रुजू

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाची सूत्रे गजेंद्र चिंतामण बावणे यांनी मंगळवारी (८ सप्टेंबर) स्वीकारली.



मूळचे नागपूर येथील रहिवासी असलेले श्री.बावणे यांनी अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातून एम.एस्सी. (अॅग्री) पूर्ण केलेले आहे.

१९९९ मध्ये राज्य शासनाच्या सेवेत सरळ सेवेने उपजिल्हाधिकारी म्हणून ते अमरावती येथे रुजू झाले. बुलढाणा येथे जिल्हा जात पडताळणी समितीचे अध्यक्ष, अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयात महसूल तसेच पुनर्वसन विभागाचे अतिरिक्त आयुक्त म्हणूनही त्यांनी कर्तव्य बजावलेले आहे. २०२५ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नती झाल्यानंतर त्यांची पुणे येथील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या आयुक्तपदी नियुक्ती झाली.

तेथे जवळपास वर्षभर कर्तव्य बजावल्यानंतर त्यांनी आता म हावितरणच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाची सूत्रे स्वीकारली आहेत.

# सामाजिक समरसतेसाठी सर्व घटकांनी एकत्र येऊन बंधुभाव जागृत केला पाहिजे - विक्रांत भांगे

पुणे दि. ८ (प्रतिनिधी) – आपल्या देशातील संस्कृतीचा अभिमान बाळगून समाजातील सर्व घटकांनी एकत्र येत बंधुभाव जागृत केला तरच जातीच्या भिंती खऱ्या अर्थाने नष्ट होतील आणि सामाजिक समरसता साध्य करता येईल असे प्रतिपादन रा. स्व. संघ पिंपळे सौदागर येथील संपर्क प्रमुख विक्रांत भांगे यांनी केले.



पिंपळे सौदागर येथील द रायका स्कुल येथे आयोजित सामाजिक सद्भाव बैठकीत ते बोलत होते. रविवार दि. सहा रोजी सकाळी झालेल्या या बैठकीत क्रांतीचंद्रजी चटपल्लीवार यांनी पंच परिवर्तन अंतर्गत स्वबोध, नागरी शिष्टाचार, सामाजिक समरसता, पर्यावरण आणि कुटुंब प्रबोधन या माध्यमातून समाजाप्रती नागरिकांचे कर्तव्य आणि जबाबदारी याबाबत विचार मांडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतमातेचे प्रतिमा पूजन करण्यात आले. पसायदानाने बैठकीची सांगता करण्यात आली. सच्चिदानंद पाठक यांनी ' जाग रहा है जन – गण – मन, निश्चित होगा परिवर्तन ' हे गीत सादर केले. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन विवेक भोसेकर यांनी केले.

# पिस्टलसह तीन जिवंत काडतुसे जप्त; दोन तरुणांना अटक

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) – जटवाडा रोड परिसरातील गॅलेक्सी टर्फर्फ येथे देशी बनावटीचे पिस्टल व तीन जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या दोन तरुणांना बेगमपुरा पोलिसांनी तत्काळ अटक केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून मोबाईलसह एकूण ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



अरबाज अलीम शेख (वय १९, रा. जटवाडा गाव) आणि खान अय्यान नईम खान (वय २१, रा. जफर पार्क, जटवाडा रोड, हरणे पेट्रोल पंपाजवळ) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.०५ वाजता गॅलेक्सी टर्फर्फ, जटवाडा रोड येथे पोलिसांनी कारवाई केली. अरबाज अलीम शेख याच्या ताब्यातून सुमारे ४० हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्टल आणि तीन जिवंत काडतुसे, तसेच सुमारे १० हजार रुपये किमतीचा मोबाईल असा मुद्देमाल मिळून आला. तर खान अय्यान नईम खान याच्याकडून सुमारे १० हजार रुपये किमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला.

पिस्टल व काडतुशांबाबत पोलिसांनी अरबाज याच्याकडे चौकशी केली असता, खान अय्यान नईम खान याने हे अग्निशस्त्र आपल्याकडे दिल्याचे त्याने सांगितले, अशी माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर अय्यान यालाही ताब्यात घेण्यात आले. दोन्ही आरोपींच्या मोबाईलची तपासणी केली असता अरबाजच्या मोबाईलच्या फोटो गॅलरीमध्ये पिस्टलचे फोटो व व्हिडिओ आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय हत्यार कायद्यातील कलम ३, २५ तसेच महाराष्ट्र पोलिस कायद्यातील कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस आयुक्तांच्या मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचाही आरोप आरोपींवर ठेवण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी (पीसीआर) मिळाली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक मनीषा केदार करीत आहेत. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविणा यादव, पोलीस उपनिरीक्षक मारुती मादेवाड, हवालदार उमेश ठाकूर, पोलीस कर्मचारी शैलेश नलवाडे, जगताप आणि पोलीस उपनिरीक्षक मनीषा केदार यांच्या पथकाने केली.

# तरुणांनी शेतीसोबत आधुनिक कृषी उद्योगांमध्ये पुढे यावे - कृषी सचिव परिमल सिंह

विजय चौधरी, खुलताबाद,

शेतकरी तरुणांनी शेतीसोबत आधुनिक कृषी उद्योगांमध्ये पुढे येण्याचे आवाहन करत पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड दिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक मजबूत होऊ शकते, असे प्रतिपादन कृषी सचिव परिमल सिंह यांनी केले. खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे आदर्श डेअरी प्रॉडक्ट प्रकल्पाला भेट देऊन पाहणी केली. त्याप्रसंगी ते बोलत होते.




यावेळी आदर्श डेअरी प्रॉडक्टचे संदीप नलावडे यांनी कृषी सचिव परिमल सिंह यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संदीप नलावडे यांनी दोन वर्षांपूर्वी सुरू केलेल्या आदर्श डेअरीचा उद्योग प्रकल्पाची माहिती घेऊन दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करून परदेशात निर्यात करण्याबाबत त्यांनी प्रोत्साहन दिले.

बाजार सावंगी येथील आदर्श डेअरी प्रॉडक्ट चे संदीप नलावडे यांनी सांगितले की, सुरुवातीला कृषी विभागाच्या आत्मा अंतर्गत आनंद डेअरी गुजरात येथे प्रशिक्षणाची संधी मिळाली आणि तोच टर्निंग पॉईट ठरला. दहा लाख रुपये गुंतवणूक करून प्रधानमंत्री सूक्ष्म व अन्नप्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत आदर्श डेअरी प्रोडक्ट उद्योग उभारला आहे. या माध्यमातून सन २०२० पासून ते गेले चार-पाच वर्षे सातत्यपूर्ण प्रगती व ब्रँड निर्मिती केली आहे. या प्रकल्पासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत सात लाख पन्नास हजार रुपये तर पी एम एफ अंतर्गत ब्रँडिंग व पॅकेजिंग सहाय्य म्हणून तीन लाख एक ६९ लाख हजार रुपये अनुदान मिळाले आहे.

मागील वर्षी तीन कोटी रुपयांपर्यंतची उलाढाल केल्याचे नलावडे यांनी सांगितले. आदर्श डेअरी हा ब्रँड मराठवाडा सह खानदेश जळगाव, धुळेमध्ये लोकप्रिय असून इतर नवीन उद्योजकांसाठी हे केंद्र निर्मिती व प्रशिक्षण केंद्र म्हणून देखील रोड मॉडेल असल्याचे संदीप नलावडे यांनी सांगितले.

यावेळी विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे, आत्मा च्या प्रकल्प संचालक धनश्री जाधव, उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार, उपसंचालक (आत्मा) डॉ. अभय पडिले, कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे विशाल साळवे, तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे, मंडळ कृषी अधिकारी किशोर पाडळे, कृषी अधिकारी हणमंत बोयनर, मयूर पाटील, प्रतिभा कांबळे, पल्लवी गायकवाड, संजय जाधव, कृषी सहाय्यक राजेश पदमे उपस्थित होते.

# उन्नती सोशल फाउंडेशनच्या दहीहंडी कार्यक्रमात भाव - भक्ती पुर्ण नृत्याविष्काररराने रंगत



पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) – श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवानिमित्त येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्या परिसरात दहीहंडी महोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

शनिवार दि. ५ रोजी सायंकाळी झालेल्या या महोत्सवात विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्रीकृष्ण जन्मोत्सव, कृष्ण-राधा रॅम्प वॉक, आकर्षक नृत्याविष्कार, शोभा टीमसोबत कृष्ण-राधेचे विशेष नृत्य, ५६ भोगचे अर्पण आदी कार्यक्रम घेण्यात आले. 'आला रे आला, गोविंदा आला' आणि 'गवळ्याच्या पोरींनो, जरा मडकी सांभाळा' अशा पारंपरिक गीतांनी उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या कार्यक्रमाचा परिसरातील महिला, बालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद घेतला.

उन्नती सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा प्रभागाच्या नगरसेविका डॉ. कुंदाताई संजय भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होता. भक्ती, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकोपा यांचा सुंदर संगम या महोत्सवातून अनुभवायला मिळाला.

याप्रसंगी , उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी मोरे, त्यांच्या सहकारी, उन्नती सोशल फाउंडेशनचे सदस्य, पिंपळे सौदागर मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :

राजेंद्र पांडुरंग रांजणीकर

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ करा-न्यायमूर्ती संदीप शिंदे

## कुणबी प्रमाणपत्र प्रक्रियेबाबत आढावा बैठक

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ व संबंधित पुराव्यांची नियमानुसार पडताळणी करून पात्र व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ व पारदर्शकपणे करावी, असे मार्गदर्शन न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांनी आज केले.

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबतच्या कार्यपद्धतीचा आढावा घेण्यासाठी न्यायमूर्ती श्री.शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक झाली. विभागीय आयुक्त कार्यालयातून न्यायमूर्ती शिंदे यांनी बैठकीस मार्गदर्शन केले.

यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, सह आयुक्त मंजूषा मिसकर, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष व सदस्य दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

बैठकीत उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ पडताळणी, प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती तसेच स्थानिक पातळीवरील यंत्रणांच्या भूमिकेचा आढावा घेण्यात आला. उपलब्ध नोंदींच्या आधारे पात्र प्रकरणांची कार्यवाही नियमानुसार करण्याबाबत न्यायमूर्ती शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

हैदराबाद गॅझेटच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या




कार्यवाहीत शासन निर्णयातील तरतुदींचा विचार करून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करावी. तसेच ग्राम व तालुका पातळीवरील यंत्रणांनी अर्जदारांना आवश्यक नोंदी उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये संबंधित प्रकरणांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. उपलब्ध नोंदींचा प्रभावी वापर करून पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत विभागातील जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील प्रमाणपत्र प्रक्रियेची सद्यस्थिती आणि करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या कार्यक्रमाचा विभागीय आयुक्तांकडून आढावा

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर २०२६ रोजी सिद्धार्थ उद्यानात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा व नियोजनाचा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज आढावा घेतला. कार्यक्रम सुरळीतपणे पार पडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक तयारी करून परस्पर समन्वय साधावा, असे निर्देश त्यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत सर्व विभागांच्या प्रमुखांशी सविस्तर चर्चा झाली. यावेळी पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जिल्हाधिकारी विनय गौडा, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह पोलीस, क्रीडा, शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक परिवहन, विद्युत, सामाजिक वनीकरण, अग्निशमन, समाज कल्याण आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जी. श्रीकांत म्हणाले की, मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करून हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. त्यानंतर शहरात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांच्या अनुषंगाने संबंधित विभागांना सोपविण्यात आलेली कामे वेळेत व जबाबदारीने पूर्ण करावीत. कार्यक्रमाच्या आयोजनात कोणतीही त्रुटी राहू नये, याची दक्षता घेऊन आवश्यक सुविधांचे योग्य नियोजन करावे.

मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमस्थळी स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, पत्रकार, निमंत्रित मान्यवर व पाहुण्यांची व्यवस्था राजशिष्टाचारानुसार करण्यात यावी. आसन व्यवस्था, वाहतूक, विद्युत व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा, सुरक्षा व्यवस्था तसेच इतर आवश्यक व्यवस्थांचे नियोजन संबंधित विभागांनी समन्वयाने करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री कार्यक्रमासाठी शहरात उपस्थित असताना विविध संघटना, नागरिक व इतर घटकांकडून निवेदने दिली जातात. या अनुषंगाने संबंधित विभागांनी प्राप्त निवेदनांची दखल घेऊन संबंधित विषयांवर नियमानुसार कार्यवाही करावी. नागरिक व विविध घटकांच्या मागण्यांबाबत आवश्यकतेनुसार समन्वय साधून त्यांचे नियमानुसार निराकरण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्व आवश्यक बाबींचे पूर्वनियोजन करून संबंधित विभागांनी पोलीस प्रशासन व विभागीय आयुक्त कार्यालयाशी समन्वय ठेवावा. कार्यक्रम सुरळीतपणे पार पडण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर सहकार्याने काम करावे, असे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार म्हणाले, कार्यक्रमाच्या अनुषंगाने पोलीस प्रशासनाच्या वतीने आवश्यक सुरक्षा व वाहतूक व्यवस्था करण्यात येत आहे. विविध विभागांशी संबंधित असलेल्या अथवा कार्यक्रमादरम्यान उद्भवणाऱ्या संभाव्य बाबींची माहिती वेळेत पोलीस प्रशासनास देण्यात यावी, जेणेकरून त्यानुसार आवश्यक उपाययोजना करता येतील.

जिल्हाधिकारी विनय गौडा आणि महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनीही त्यांच्या विभागामार्फत करण्यात येत असलेल्या पूर्वतयारी व व्यवस्थेची माहिती बैठकीत दिली.

# भरती परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी सूचना, अभिप्राय देण्याचे विभागीय आयुक्तांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा सुचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यांतील विद्यार्थी, परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी व नागरिकांनी सूचना व अभिप्राय द्यावेत, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक व विश्वासार्ह करण्यासह गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीचे सदस्य २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात भेट देणार आहेत. यावेळी छत्रपती संभाजीनगर विभागातील विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्था व संबंधित घटकांशी चर्चा करून परीक्षा पद्धतीतील सुधारणा, अडचणी व उपाययोजनांबाबत सूचना व अभिप्राय जाणून घेतले जाणार आहेत.

या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड व हिंगोली या आठ जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी कार्यालयांत विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत. संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयातील निवासी उपजिल्हाधिकारी हे या प्रक्रियेचे नोडल अधिकारी राहणार आहेत. विशेष कक्षात नागरिकांना आपल्या सूचना, शिफारशी, हरकती व निवेदने प्रत्यक्ष सादर करता येतील.

विशेष कक्ष १८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत कामकाजासाठी खुला राहणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष कक्षात प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसलेल्या नागरिकांनी आपले लेखी अभिप्राय विहित मुदतीत csn-examreformstaskforce@maharashtra.gov.in या ई-मेलवर पाठवावेत.

भरती परीक्षा पद्धती अधिक सक्षम व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने विद्यमान परीक्षा प्रणालीचा आढावा, विविध शासकीय विभाग, प्राधिकरणे व परीक्षा घेणाऱ्या संस्थांच्या सध्याच्या परीक्षा पद्धती व कार्यपद्धतीबाबतही सूचना मागविण्यात आल्या आहेत. परीक्षा अधिक सुरक्षित, विश्वासार्ह, निष्पक्ष व उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत नागरिकांनी आपले मत मांडावे.

प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकाल जाहीर होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया, प्रश्नपत्रिकेचे मुद्रण, डिजिटल अथवा मुद्रित स्वरूपातील वितरण, गोपनीय वाहतूक, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन, प्रतिसाद नोंदणी, मूल्यांकन व निकाल प्रक्रियेतील सुरक्षितता याबाबतही अभिप्राय अपेक्षित आहेत. डिजिटल प्रणाली, बायोमेट्रिक प्रमाणीकरण, प्रवेश नियंत्रण, लेखापरीक्षण नोंदी व सीसीटीव्ही देखरेख यांसारख्या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याबाबतही सूचना देता येणार आहेत.

पेपरफुटी, गोपनीयतेचा भंग, तोतया उमेदवार, संगनमत व इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा गैरवापर रोखण्यासाठी कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना व उत्तरदायित्व निश्चित करण्याबाबत सूचना मागविण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्रांसाठी किमान पायाभूत सुविधा, सुरक्षितता, मनुष्यबळ व कार्यक्षमतेची मानके निश्चित करण्याबाबतही अभिप्राय देता येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस यंत्रणा, शिक्षण विभाग व परीक्षा संस्था यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण करण्याबाबत तसेच उमेदवारांसाठी जलद व पारदर्शक तक्रार निवारण व्यवस्था उभारण्याबाबतही सूचना अपेक्षित आहेत. इतर राज्ये व देशांतील यशस्वी, आधुनिक व सुरक्षित परीक्षा पद्धतींचा अभ्यास करून त्यातील उत्कृष्ट पद्धती राज्यात लागू करण्याबाबतही नागरिक आपले मत मांडू शकतात.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त होणाऱ्या सर्व सूचना व अभिप्रायांचे संकलन करून ते उच्चस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहेत. समिती या सूचनांचा सखोल अभ्यास करून राज्य शासनाला सर्वसमावेशक अंतिम अहवाल सादर करणार आहे.

राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षा परीक्षार्थींच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या प्रक्रियेत छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व नागरिक, विद्यार्थी, परीक्षार्थी, अभ्यासक व संबंधित संस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून भरती परीक्षा पद्धती अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी आपल्या सूचना व अभिप्राय द्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.


![MAHAGENCO]

## NOTICE INVITING e-TENDER

MAHAGENCO Maharashtra State Power Generation Co. Ltd.

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Estimate Amount Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | 3000071916 | Proposal for "Procurement of ThordonShaft seal at Ghatghar HPS." | 8,83,000.00/- | 12,330.00/- |

**Tender Cost :** Rs. 1180.00
**Contact Person :** Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel. No. 0253 2810185 / 2810485
For further details visit our Website : **https://eprocurement.mahagenco.in**
1. All interested vendors are requested to register to our website for e-tender : **https://eprocurement.mahagenco.in**
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

**Superintending Engineer, REC Ghatghar**


# मराठा आरक्षणासंदर्भात उच्चस्तरीय समितीची आज महत्त्वाची बैठक; कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रमाणपत्र प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्यासह प्रलंबित प्रश्नांवर होणार सविस्तर चर्चा

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या विविध बाबींचा आढावा घेऊन कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीतील त्रुटी व अडचणींचे निराकरण, प्रलंबित प्रश्नांचा निपटारा तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक उद्या, दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत क्षेत्रीय स्तरावरील विविध बाबींचा सखोल आढावा घेऊन पुढील कार्यवाहीची दिशा निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज येथे दिली.

आज विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मराठा आरक्षणासंदर्भातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील, विभागातील सहाही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक तसेच सर्व उपविभागीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आमदार प्रसाद लाड, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, जालना जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जालना पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते.

बैठकीत मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीसह इतर संलग्न बाबींचा सखोल आढावा घेण्यात आला. क्षेत्रीय स्तरावरील विविध बाबी, उपलब्ध माहिती, नोंदी तसेच संबंधित प्रक्रियेतील अडचणी याबाबतही चर्चा करण्यात आली.

दि. ९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या उच्चस्तरीय समितीच्या बैठकीस मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील, मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, आमदार प्रसाद लाड, समितीचे सदस्य, विभागातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलीस अधीक्षक तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि सर्व जिल्ह्यांतील जात पडताळणी समित्यांचे अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत. कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीचा आढावा, त्यातील त्रुटी व अडचणींचे निराकरण, प्रलंबित प्रश्नांचा निपटारा तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. दरम्यान, मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर व्यापक चर्चा होण्यासाठी या विषयाचा अभ्यास असलेले अभ्यासक तसेच आंदोलनाशी संबंधित अभ्यासकांनी बैठकीत सहभागी होऊन समितीसमोर आपली भूमिका व सूचना मांडाव्यात, असे आवाहन उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले आहे.


## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, ई-निविदा सुचना

निष्काम जन सेवाये समर्पिता

जा.क्र./मनपा/ई- निविदा/२०२६/१३७
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक:- ०८.०९.२०२६

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा भरण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | झोन क्र.०९ अतंर्गत असलेल्या पंचवटी चौक ते स्टेशन पर्यंत असलेल्या मुख्य रस्त्यावरील पडलेल्या खडडयांची व इतर भागातील खडडयांची पॅचवर्कव्दारे पुनः दुरुस्ती करणे बाबत | १०.०९.२०२६ |
| २ | प्रभाग क्र १४ अंतर्गत संजयनगर येथे गल्ली क्र ए-०५, बी-०५ व बी-०६ मध्ये ड्रेनेज लाइन बदलणे बाबत. | १०.०९.२०२६ |
| ३ | प्रभाग क्र.२४ अंतर्गत संतोषी माता नगर येथील गणपती विसर्जन विहिरीतील गाळ काढणे. | १०.०९.२०२६ |
| ४ | प्रभाग क्र.२४ अंतर्गत देवगिरी कॉलनी येथील गणपती विसर्जन विहिरीतील गाळ काढणे. | १०.०९.२०२६ |
| ५ | प्रभाग क्र.२४ अंतर्गत संघर्ष नगर येथील गणपती विसर्जन विहिरीतील गाळ काढणे. | १०.०९.२०२६ |
| ६ | प्रभाग क्र.१४ (अ) अंतर्गत संजयनगर येथे वैभव तेली ते विसपुते व गजराज ते जेठे यांच्या घरापर्यंत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे बाबत. | ०९.०९.२०२६ |
| ७ | प्रभाग क्र.१४ (अ) अंतर्गत संजयनगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे बाबत (हबीब भाई, ताज किराणा, रफिक भाई) | ०९.०९.२०२६ |
| ८ | प्रभाग क्र.१४ (अ) अंतर्गत संजयनगर येथे गणपती मंदिर ते समीर भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे बाबत. | ०९.०९.२०२६ |
| ९ | प्रभाग क्र.०६ युनुस कॉलनी येथील सौदागर यांच्या घरापासुन ते एस. के इंटरप्रायजेस पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे बाबत. | ११.०९.२०२६ |
| १० | प्रभाग क्र.०६ अंतर्गत एस एस कंस्ट्रक्शन ऑफिस समोर सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे | ११.०९.२०२६ |
| ११ | प्रभाग क्र.१४ (ब) नवाबपुरा अंतर्गत बुक्कलगुडा येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ०९.०९.२०२६ |
| १२ | झोन क्र.०२ अंतर्गत औषधभवन, चुनाभटटी, मोतीकारंजा व इतर ठिकाणी असलेल्या नाल्याची संरक्षित भिंत दुरुस्ती करणे व बांधणे बाबत. | ०९.०९.२०२६ |
| १३ | प्रभाग क्र.१४ (ब) नवाबपुरा अंतर्गत गुडडु भाई यांच्या घरासमोर सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ०९.०९.२०२६ |
| १४ | प्रभाग क्र.१५ अंतर्गत राजाबाजार भागात विविध ठिकाणी जलनिःसारण वाहिन्याचे कामे करणे | ०९.०९.२०२६ |
| १५ | साथरोग औषधी | १५.०९.२०२६ |
| १६ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रात महिलांकरिता प्री- फॅब्रिकेटेड स्वच्छतागृहे उभारणे बाबत. | १५.०९.२०२६ |
| १७ | प्रभाग क्र.१० सिडको एन-७ अंतर्गत ड्रेनेज लाईनचे वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १०.०९.२०२६ |
| १८ | प्रभाग क्र.१० सिडको एन-५ अंतर्गत ड्रेनेज लाईनचे वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १०.०९.२०२६ |
| १९ | प्रभाग क्र.११ सिडको एन-८ अंतर्गत ड्रेनेज लाईनचे वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १०.०९.२०२६ |
| २० | प्रभाग क्र.११ अविष्कार कॉलनी सिडको एन-६ अंतर्गत ड्रेनेज लाईनचे वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १०.०९.२०२६ |
| २१ | वार्ड क्र.२९ श्रीकृष्ण नगर येथील सपना ब्युटी पार्लर ते भागवत ताई यांच्या घरापर्यंत आणि तिवारी यांच्या घरापासुन ते श्री पितळखोर यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन बदलणे. | १०.०९.२०२६ |
| २२ | वार्ड क्र.१२ (प्रभाग क्र.०३) बेगमपुरा अंतर्गत सर्व्हे नं ३७ गोपालनगर येथील अनुपमा यांच्या घराजवळ सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्याकडेला पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत. | १०.०९.२०२६ |
| २३ | प्रभाग क्र.०३ मधील भिमनगर येथील श्रावस्ती सामाजिक सभागृहाच्या छताचे वॉटर प्रुफिंग करणे व संरक्षित भिंत बांधणे बाबत. | १०.०९.२०२६ |
| २४ | प्रभाग क्र.०५ मधील काझीवाडा येथील आंनद सामाजिक सभागृहाची दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे बाबत. | १०.०९.२०२६ |
| २५ | प्रभाग क्र.०८ आंबेडकर नगर अंतर्गत ड्रेनेज लाईनचे वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १५.०९.२०२६ |
| २६ | प्रभाग क्र.०६ अंतर्गत मोटे भाभी ते शकील भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे बाबत. | १२.०९.२०२६ |
| २७ | प्रभाग क्र.०९ नारेगाव अंतर्गत ड्रेनेज लाईनचे वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १५.०९.२०२६ |
| २८ | प्रभाग क्र.०८ नारेगाव अंतर्गत ड्रेनेज लाईनचे वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १५.०९.२०२६ |
| २९ | प्रभाग क्र.१० सिडको एन-१ अंतर्गत ड्रेनेज लाईनचे वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १५.०९.२०२६ |
| ३० | झोन क्र.३ अंतर्गत बायजीपुरा मनपा स्कुल येथे हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे अर्बन वेल्फेअर फंड अंतर्गत विविध दुरुस्ती करणे बाबत. | १५.०९.२०२६ |
| ३१ | वार्ड क्र.०५ वानखेडेनगर अंतर्गत पोलिस कॉलनी मधील श्री कांबळे यांच्या घराजवळील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे बाबत. | १५.०९.२०२६ |
| ३२ | वार्ड क्र.०८ सुरेवाडी अंतर्गत अस्तित्वातील जलनिःसारण वाहिनीची देखभाल दुरुस्ती करणे, लाईन टाकणे, चेंबर बांधणे इ. कामे करणे बाबत. | १५.०९.२०२६ |
| ३३ | वैद्यकीय उपकरणे व साहित्य खेरेदी | २१.०९.२०२६ |
| ३४ | हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण निधी अंतर्गत बनेवाडी येथील छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शाळेच्या स्वच्छतागृहाची देखभाल व दुरुस्ती करणे तसेच वाचनालय, प्रयोगशाळा शाळेची कमान व हॅण्डवॉश स्टेशन विकसित करणे. | १५.०९.२०२६ |
| ३५ | प्रभाग क्रंमाक २९ अंतर्गत अभिनंदन हौसिंग सोसायटी, ईटखेडा येथे शोभिवंत वृक्ष लागवड करणे बाबत. | १५.०९.२०२६ |
| ३६ | झोन क्र. ०२ अंतर्गत गणपती विसर्जन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती तसेच शिव जयंती निमीत्त मिरवणुक मार्गावरील छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध रस्ते लाकडी बल्ल्यांचे व लोखंडी पत्र्याचे बॅरीकेटींग करुन वाहतुक सुरळीत करणे बाबत (२ वर्षासाठी) | १०.०९.२०२६ |
| ३७ | हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान अंतर्गत आरोग्य केंद्रामध्ये विद्युत विषयक दुरुस्ती वे रेट्रोफिंटीची कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ३८ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र. ०१ अंतर्गत सर्व शाळा, दवाखाने, सभागृह व विविध इमारतीचे वार्षीक विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ३९ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र.०२ अंतर्गत सर्व शाळा, दवाखाने, सभागृह व विविध इमारतीचे वार्षीक विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ४० | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र.०३ अंतर्गत सर्व शाळा, दवाखाने, सभागृह व विविध इमारतीचे वार्षीक विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ४१ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र. ०४ अंतर्गत सर्व शाळा, दवाखाने, सभागृह व विविध इमारतीचे वार्षीक विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ४२ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र.०५ अंतर्गत सर्व शाळा, दवाखाने, सभागृह व विविध इमारतीचे वार्षीक विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ४३ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र. ०६ अंतर्गत सर्व शाळा, दवाखाने, सभागृह व विविध इमारतीचे वार्षीक विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ४४ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र.०७ अंतर्गत सर्व शाळा, दवाखाने, सभागृह व विविध इमारतीचे वार्षीक विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ४५ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र.०८ अंतर्गत सर्व शाळा, दवाखाने, सभागृह व विविध इमारतीचे वार्षीक विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ४६ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र.०९ अंतर्गत सर्व शाळा, दवाखाने, सभागृह व विविध इमारतीचे वार्षीक विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ४७ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका झोन क्र.१० अंतर्गत सर्व शाळा, दवाखाने, सभागृह व विविध इमारतीचे वार्षीक विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे बाबत. | १६.०९.२०२६ |
| ४८ | मनपाच्या जलतरण तलाव या ठिकाणाची जुन्या टाईल्स काढुन नवीन बसविणे बाबत. | १०.०९.२०२६ |

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकायांचे वतीने योग्यत्या वर्गातील ठेकेदारांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची विस्तृत माहिती संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे.

स्वाक्षरीत/-
सिस्टीम मॅनेजर (ई-निविदा)
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका


## (पान १ वरुन)

(पान १ वरुन)

### उत्सव लोकांसाठी, त्रास...

सण असताना त्यामध्ये अशा नृत्यांची गरज काय, असा प्रश्नही त्यांनी विचारला. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते अनेक उत्सव मंडळांमध्ये सहभागी असतात. त्यामुळे राजकीय पक्षांनी मतांच्या राजकारणापलीकडे जाऊन या विषयावर स्पष्ट भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

शिवसेनेच्या नाव आणि धनुष्यबाण चिन्हासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीवरही उद्धव ठाकरे यांनी भाष्य केले. कपिल सिब्बल यांनी चिन्ह गोठवण्याची मागणी केली, असा अर्थ काढणे चुकीचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपल्याला शिवसेनेचे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह मिळाले पाहिजे, यासाठीच हा न्यायालयीन लढा सुरू आहे. मात्र निकालाला विलंब होत असेल तर संबंधित चिन्हाचा गैरवापर होऊ नये, यासाठी ते गोठवण्याचा पर्याय मांडण्यात आला, असे त्यांनी स्पष्ट केले. चिन्ह आणि पक्षाच्या नावाचा कथित गैरवापर करून सत्ता मिळवली आणि त्यानंतर त्याचा गैरवापर झाला, असा आरोपही त्यांनी केला.

काही बनावट राजकीय पक्षांच्या कथित नोंदणीचा संदर्भ देत ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कामकाजावरही प्रश्न उपस्थित केले. मोठ्या मालमत्तेशी संबंधित पक्षांची नोंदणी, त्यांच्या घटना आणि आर्थिक व्यवहारांची पुरेशी छाननी होते का, असा सवाल त्यांनी केला. गेल्या काही वर्षांत अनेक निवडणुका पार पडल्या असूनही आपल्या पक्षाच्या नाव आणि चिन्हाबाबतचा वाद अद्याप कायम असल्याचे त्यांनी सांगितले. ''तारीख पे तारीख'' अशा पद्धतीने प्रकरण लांबणे योग्य नसल्याचे ते म्हणाले.

### आमच्याकडे काहीतरी योजना आहे,..

(पॅन-इंडिया) आदेश जारी करू. आमच्याकडे काहीतरी योजना आहे'', असं निरीक्षण न्यायमूर्ती अमानुल्लाह यांनी नोंदवले आणि पुढील सुनावणी १० सप्टेंबर निश्चित केली. दिल्लीतील सत्य निकेतन भागात विद्यार्थ्यांचे पीजी असलेले एक पाच मजली इमारती कोसळून सात जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेत अनेक जण जखमी झाले आहेत. प्राथमिक तपासानुसार, अनेक वर्षे जुन्या असलेल्या या इमारतीत केलेले अनधिकृत बदल, तळघरातील (बेसमेंट) काम आणि संरचनेत आलेला कमकुवतपणा यामुळे ही दुर्घटना घडल्याचं समोर येत आहे. या प्रकरणी प्रशासनाने इमारत मालकाला अटक केली असून एमसीडीच्या संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे.


## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

Truhome FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**मुख्य कार्यालय.** लेव्हल ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२ ब्लॉक,वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
**वेबसाइट:** www.truhomefinance.in

### प्रतिकात्मक ताबा सूचना

ज्याअर्थी, खाली सही करणारे अधिकारी हे ट्रूहॉम फायनान्स लिमिटेड (पूर्वीचे श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांचे अधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ("उक्त अधिनियम") च्या तरतुदींनुसार तसेच उक्त अधिनियमाच्या कलम १३(१२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ ("उक्त नियम") मधील नियम ३ सह वाचून, खालील तक्त्यामध्ये तपशील नमूद केलेल्या कर्जदारांना उक्त मागणी सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केल्या आहेत.
कर्जदारांनी सदर रकमेची परतफेड करण्यात अपयशी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदारांना तसेच सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, खाली सही करणारे ट्रूहॉम फायनान्स लिमिटेड (पूर्वीचे श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांचे अधिकृत अधिकारी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम १३(४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि उक्त नियमांच्या नियम ८ सह वाचून, खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.
कर्जदारास विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तेशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. सदर मालमत्तेशी करण्यात येणारा कोणताही व्यवहार हा ट्रूहॉम फायनान्स लि (पूर्वीचे श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांच्या खाली नमूद केलेल्या रकमेवरील तसेच त्यावरील व्याजासह असलेल्या हक्कभाराच्या अधीन राहील.कर्जदाराचे लक्ष उक्त अधिनियमाच्या कलम १३ मधील उपकलम (८) मधील तरतुदींकडे वेधण्यात येत आहे, ज्यामध्ये सुरक्षित मालमत्ता विमोचित करण्यासाठी उपलब्ध असलेल्या कालावधीबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**श्रीमती मेघा सतीश बनकर (कर्जदार)**
**श्री. सतीश कैलास बनकर (सह-कर्जदार)**
**पत्ता: रो हाऊस क्र. ११३, सारा सह्याद्री पार्क, वैजापूर म. क्ल., वैजापूर-शिर्डी रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत – ४२३७०१.**
**तसेच येथे: नागपूर-मुंबई हायवे, मकरमतपूर, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४२३७०३.**
**तसेच येथे: लाडगाव रोड, वैजापूर म. क्ल., वैजापूर, वॉटर टँकजवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत – ४२३७०१.मालमत्तेचा पत्ता:रो हाऊस क्र. ११३, सारा सह्याद्री पार्क, वैजापूर म. क्ल., वैजापूर-शिर्डी रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत – ४२३७०१.**

**थकबाकी रक्कम**

रु. १५,६१,८००.६६/- (अक्षरी रुपये पंधरा लाख एकसष्ट हजार आठशे आणि सहासष्ट पैसे फक्त) कर्ज खाते क्र. TBTHAURD0001407 अंतर्गत तसेच रु. ४,४०,८४४.८०/- (अक्षरी रुपये चार लाख चाळीस हजार आठशे चव्वेचाळीस आणि ऐंशी पैसे फक्त) कर्ज खाते क्र. TTUHAURD0001429 अंतर्गत, दिनांक ०९-०६-२०२६ रोजी थकीत होते.
मागणी सूचना दिनांक : ११/०२/२०२६ प्रतीकात्मक ताबा दिनांक : ०४/०९/२०२६

**मालमत्तेचे वर्णन**

मौजे वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथे स्थित असलेल्या "सारा सह्याद्री पार्क" या प्रकल्पामध्ये गट क्र. १९७/१ वर बांधण्यात आलेले, प्लॉट क्षेत्रफळ ५६.२१ चौ. मीटर, बांधकाम क्षेत्रफळ ६४.०५ चौ. मीटर व अविभाजित हिस्सा ६२.०० चौ. मीटर असलेले रो हाऊस क्र. ११३, ही सर्व ती जमीन व मालमत्ता असून तिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत:- पूर्वेस : ९ मीटर रस्ता पश्चिमेस : रो हाऊस क्र. ८८ दक्षिणेस : रो हाऊस क्र. ११४उत्तरेस : रो हाऊस क्र. ११२

ठिकाण - छत्रपती संभाजीनगर
दिनांक : ०४/०९/२०२६
स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)